**आकाशवाणी पुणे**

**प्रादेशिक वृत्त विभाग**

**पुणे वृत्तांत**

**वेळ - संध्याकाळी 06.00 वा.**

**दिनांक- 17.05.2025** **वार- शनिवार**

---

**पशु**

ग्रामीण भागातील सुशिक्षित, बेरोजगार युवकांसह पशुपालक आणि शेतकरी बांधवांना स्वयंरोजगाराच्या साधनेतून शाश्वत अर्थार्जनाचा पर्याय उपलब्ध व्हावा, यासाठी पशुसंवर्धन विभागाकडून राज्य आणि जिल्हास्तरीय विविध योजना राबवल्या जात आहेत. यातील गेल्या सात वर्षांपासून ऑनलाइन पद्धतीनं मागवण्यात येत असलेल्या, वैयक्तिक लाभाच्या, राज्यस्तरीय नावीन्यपूर्ण योजनेतील अर्ज भरण्यास, नुकतीच सुरुवात झाली आहे. भोर तालुक्यातील इच्छुकांनी योजनांचा लाभ घेण्यासाठी, ऑनलाइन पद्धतीनं अर्ज दाखल करण्याचं आवाहन, पशुधन विकास अधिकारी डॉक्टर वर्षाराणी जाधव यांनी केलं आहे.

**रक्तदाब**

राज्याच्या सार्वजनिक आरोग्य विभागामार्फत राष्ट्रीय असंसर्गजन्यरोग प्रतिबंध आणि नियंत्रण कार्यक्रमांतर्गत 30 वर्षांवरील नागरिकांची उच्च रक्तदाब तपासणी करण्यात येते. या अंतर्गत 2024-25 मध्ये 1 कोटी 36 लाखांहून अधिक नागरिकांची उच्च रक्तदाब तपासणी करण्यात आली, त्यापैकी 23 लाख 87 हजारपेक्षा अधिक रुग्णांना उच्च रक्तदाब असल्याचं

निदान झालं. त्यांच्यावर आरोग्य विभागामार्फत पाठपुरावा करून उपचार करण्यात येत आहेत. राज्यातील सर्व शासकीय आरोग्य संस्थांमध्ये उच्च रक्तदाब चाचणी आणि उपचार मोफत उपलब्ध आहेत. बदलती जीवनशैली, मानसिक तणाव, अपुरी झोप यांचा परिणाम नागरिकांच्या आरोग्यावर होत असून, त्यात उच्च रक्तदाब असलेल्या रुग्णांची संख्या अन्य आजारांच्या तुलनेत अधिक आहे.

**निकाल**

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या पदव्युत्तर संस्था, यशवंतराव चव्हाण स्मृती रुग्णालयातील सन 2021 च्या पदव्युत्तर एम.डी./एम.एस. या अभ्यासक्रम परीक्षेचा निकाल नुकताच जाहीर झाला आहे. या अभ्यासक्रमातील 33 पैकी 21 विद्यार्थी यशस्वी झाले आहेत. महाराष्ट्र राज्य आरोग्य विज्ञान विद्यापीठाद्वारे घेतल्या जाणाऱ्या राज्यस्तरीय परीक्षेत जनरल सर्जरी विभागातील 6 पैकी 6 विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत. या विभागातील डॉक्टर प्रीत शहानी  राज्यात प्रथम क्रमांक तसंच सुवर्ण पदक मिळवलं. तर डॉक्टर अजिंक्य आक्रे यांनी राज्यात पाचवा क्रमांक मिळविला. जनरल मेडिसीन विभागात 3 विद्यार्थी उत्तीर्ण झाले असून डॉक्टर रवी केसवानी यांनी प्रथम क्रमांक आणि सुवर्ण पदक मिळवलं. बालरोग विभागात 4 विद्यार्थी उत्तीर्ण झाले असून डॉ. मेहेरीन मीर यांनी राज्यात दुसरा क्रमांक मिळवला. या तुकडीचा निरोप समारंभ महापालिका आयुक्त शेखर सिंह यांच्या उपस्थितीत नुकताच पार पडला.

**प्रवासी**

पुणे महानगर क्षेत्रातील 11 लाख पीएमपीएमएल प्रवाशांपैकी सुमारे 22 टक्के प्रवासी पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या हद्दीमध्ये असणाऱ्या बस रॅपिड ट्रान्झिट सिस्टीम अर्थात बीआरटीएस कॉरिडॉरचा वापर करीत आहेत. पीएमपीएमएलच्या उपलब्ध आकडेवारीनुसार सध्या बीआरटीएसमार्फत दररोज 2 लाख 40 हजार प्रवासी प्रवास करीत आहेत. त्यामुळं ही सेवा पिंपरी चिंचवड शहरातील अत्यावश्यक सार्वजनिक वाहतूक सेवा ठरली आहे. पिंपरी चिंचवडमध्ये सध्या निगडी-दापोडी, दिघी-आळंदी, सांगवी-किवळे, काळेवाडी-चिखली आणि नाशिक फाटा-वाकड असे पाच बीआरटीएस कॉरिडॉर कार्यरत आहेत. हे कॉरिडॉर शहराच्या पूर्व - पश्चिम आणि उत्तर - दक्षिण भागांतील महत्त्वाच्या जवळपास 111 मार्गांना जोडतात. शहरातील 96 टक्के लोकसंख्या बस थांब्यापासून 500 मीटर परिसरात राहते अशी माहिती पालिका आयुक्त शेखर सिंह यांनी दिली.

**परिषद**

डॉक्टर डी वाय पाटील स्कूल ऑफ लिबरल आर्ट्स वतीनं भारतीय नृत्य शैलीवर आधारित आंतरराष्ट्रीय नृत्य परिषदेचं आयोजन करण्यात आलं होतं. सांस्कृतिक मंत्रालयाच्या संगीत अकादमीच्या अध्यक्ष डॉक्टर संध्या पुरेचा प्रमुख पाहुण्या म्हणून उपस्थित होत्या. यावेळी कथ्थक गुरु डॉक्टर नंदकिशोर कपोते यांच्या शिष्यांनी कथक सादर केलं तर गुरु स्वाती दैठणकर यांच्या विद्यार्थिनींनी भरत नाट्यम सादर केलं. विविध राज्यातील लोकनृत्यंही यावेळी सादर करण्यात आली.

**केळकर**
पुण्यातील राजा दिनकर केळकर संग्रहालयात आता बहुभाषिक स्मार्ट डिजिटल ऑडिओ गाइड सुविधा उपलब्ध होणार आहे. त्यामुळे संग्रहालयाला भेट देणाऱ्या पर्यटकांना संग्रहालयाच्या निर्मितीची पार्श्वभूमी आणि विविध दालनांमध्ये प्रदर्शित करण्यात आलेल्या दुर्मीळ वस्तूंची मराठी, हिंदी आणि इंग्रजी या तीन भाषांमध्ये सविस्तर माहिती मिळणार आहे. फ्रान्समधील आंतरराष्ट्रीय संग्रहालय परिषदेनं उद्या १८ मे रोजी आंतरराष्ट्रीय संग्रहालय दिनानिमित्त ‘संग्रहालयांचं भविष्य’ या संकल्पनेवर आधारित विविध कार्यक्रमांचं आयोजन करण्याचं उद्दिष्ट जाहीर केलं आहे. त्याला अनुसरून राजा दिनकर केळकर संग्रहालयाने कालसुसंगत असा ‘डिजिटल ऑडिओ गाइड’ हा उपक्रम सुरू केला आहे अशी माहिती संग्रहालयाचे संचालक सुधन्वा रानडे यांनी दिली.

पुणे आणि परिसरात सध्या ढगाळ हवामान आहे. कमाल तापमान 35 अंश सेल्सियस नोंदविण्यात आलं. उद्याही अशाच हवामानाचा अंदाज पुणे वेधशाळेनं व्यक्त केला आहे.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविध भारती पुणे केंद्रावर, संध्याकाळी सहा वाजता, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये, नमस्कार.**